2. The above unaudited standalone and consolidated financial results is an extract of the detailed format of quarter and nine months ended 31st December, 2023. Financial Results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of quarter and nine months ended 31st December, 2023 Financial Results are available on the Stock Exchange website viz. **www.nseindia.com**. The same is also available on the Company's webite viz. **www.jashindia.com**.

For Jash Engineeering Limited
Sd/-
Pratik Patel
Chairman & Managing Director
DIN - 00780920

Place: Indore
Date: 02/02/2024

Ladderup
Engineering Growth

LADDERUP FINANCE LIMITED

Regd. Off.: A-102, 1st Floor, Hallmark Business Plaza, Sant Dyaneshwar Marg, Near Gurunanak Hospital, Bandra (East), Mumbai - 400 051. India ,
❑ **Tel.:** +91 22 4246 6363 ❑ **Fax:** +91 22 4246 6364 ❑ **CIN:** L67120MH1993PLC074278
❑ **E-mail:** info@ladderup.com ❑ **Website:** www.ladderup.com

Extract of Consolidated Unaudited Financial Results for the Quarter and Nine Months Ended December 31, 2023

(Rs in Lakh except EPS)

Sr. No.	Particulars	Quarter Ended		Nine Month Ended	Year Ended
		31.12.2023 Unaudited	31.12.2022 Unaudited	31.12.2023 Unaudited	31.03.2023 Audited
1.	Total income from operations (net)	336.11	233.95	899.23	1,117.81
2.	Net profit / (loss) for the period from ordinary activities (before tax, exceptional and/or extraordinary items)	104.53	(68.56)	125.27	(134.38)
3.	Net profit / (loss) for the period before tax (after exceptional and/or extraordinary items)	104.53	(68.56)	125.27	(134.38)
4.	Net profit / (loss) for the period after tax (after exceptional and/or extraordinary items)	141.51	(69.76)	102.59	(131.10)
5.	Total comprehensive income for the period {comprising profit/ (loss) for the period (after tax) and other comprehensive income (after tax)}	278.25	(331.51)	917.55	17.41
6.	Equity share capital (Face Value ₹10/- per share)	1,285.26	1,285.26	1,285.26	1,285.26
7.	Earnings Per Share (face value ₹ 10 each)* (a) Basic (in ₹) (b) Diluted (in ₹)	0.83 0.83	(0.45) (0.45)	0.47 0.47	(1.00) (1.00)

*** Earnings per shares for the interim period is not annualised**

Notes :

1. **Standalone Information :** (Rs in Lakh except EPS)

Sr. No.	Particulars	Quarter Ended		Nine Month Ended	Year Ended
		31.12.2023 Unaudited	31.12.2022 Unaudited	31.12.2023 Unaudited	31.03.2023 Audited
1	Income from operations	17.73	28.05	67.08	129.81
2	Net Profit before tax	(36.39)	(20.90)	(70.47)	(195.62)
3	Net Profit after tax	(14.04)	(19.46)	(74.35)	(109.66)
4	Earning Per Share (in ₹) (Basic / Diluted)	(0.11)	(0.15)	(0.58)	(0.85)

2 The above is an extract of the detailed format of Quarter and Nine months ended 31st December, 2023 Financial Results filed with the stock exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations 2015. The full format of the Quarter ended Financial Results are available on the Company's website at www.ladderup.com and on the website of BSE: www.bseindia.com.

3 The impact on net profit / loss, total comprehensive income or any other relevant financial item (s) due to changes (s) in accounting policies shall be disclosed by means of a footnote.

For and on behalf of the Board
Sd/-
Sunil Goyal
DIN 00503570
Managing Director

Place: Mumbai
Date: 2nd February 2024

थोडक्यात

'महापौर चषक' स्पर्धा पुन्हा सुरू करणार : मंगलप्रभात लोढा

मुंबई : 'कोरोना'काळात बंद झालेली महापौर चषक स्पर्धा पुन्हा सुरू केली जाणार आहे. येत्या दोन महिन्यांत तिचे आयोजन केले जाईल, अशी घोषणा कौशल्य विकासमंत्री तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी शनिवार, दि. ३ फेब्रुवारी रोजी केली. दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज पारंपरिक क्रीडा महाकुंभ' स्पर्धेला मंत्री लोढा यांनी शनिवारी भेट दिली. त्यामुळे स्पर्धकांचा उत्साहात आणखी दुणावला. यावेळी मंत्री लोढा म्हणाले की, ''मुंबईकर क्रीडाप्रेमींचे हक्काचे व्यासपीठ असलेली, 'महापौर चषक' स्पर्धा 'कोरोना'काळात बंद झाली. आता ही स्पर्धा सुरू करावी, अशी मागणी अनेकांनी केली आहे. त्यानुसार, येत्या दोन महिन्यांत भव्य अशा स्वरुपात 'महापौर चषक' स्पर्धेचे आयोजन केले जाईल. मंत्री लोढा यांनी यावेळी लंगडी खेळणाऱ्या मुलांसोबत संवाद साधला. मुंबई पालिकेच्या उपायुक्त चंदा जाधव, मनपा शिक्षण अधिकारी राजेश कंकाळ, माजी नगरसेविका अक्षता तेंडुलकर आदी यावेळी उपस्थित होते. मंत्री लोढा यांनी यावेळी मल्लखांब प्रशिक्षक पद्मश्री उदय देशपांडे यांची भेट घेत चर्चा केली.

मुंबई 'सीरिया' होण्याच्या उंबरठ्यावर! : नितेश राणे

मुंबई : देशाची आर्थिक राजधानी असलेल्या, मुंबईत इस्लामिक अतिक्रमण इतक्या मोठ्या प्रमाणात फोफावले आहे की, मुंबई सीरिया होण्याच्या उंबरठ्यावर आहे, असा दावा भाजप आमदार नितेश राणे यांनी शनिवार, दि. ३ फेब्रुवारी रोजी केला. नरिमन पॉईंट येथे आयोजित पत्रकार परिषदेत राणे यांनी इस्लामिक अतिक्रमणावर जोरदार हल्ला चढवला. ते म्हणाले की, ''कुठलेही नियम न पाळता, मुंबईत शासकीय जमिनीवर अनधिकृत मदरसे आणि मशिदी बांधण्यात आल्या आहेत. काही महिन्यांअगोदर पडघा गावाचे नाव बदलून, अल-शाम ठेवण्यात आले. मुंबईतील काही महत्त्वाचे भाग हे आधी हिंदूंचे होते; पण आज तेथील हिंदू नामशेष झाला आहे. रोहिंगे आणि बांगलादेशी मुसलमानांनी या जागेचा ताबा घेऊन टाकला आहे. हे बांग्लादेशी, रोहिंगे मुंबई, महाराष्ट्रात येतात कुठून? त्यांना कोण ताकद देतो? असा सवाल राणे यांनी केला.

न्यायासाठी समन्वय आवश्यक : पंतप्रधान

नवी दिल्ली, दि. ३ : विशेष प्रतिनिधी

''न्यायाशिवाय कोणत्याही राष्ट्राचे अस्तित्व शक्य नाही. आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात न्याय सुनिश्चित करण्यासाठी, अनेक देशांनी एकत्र येण्याची गरज आहे. यासाठी जागतिक समन्वय आवश्यक आहे,'' असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवार, दि. ३ फेब्रुवारी रोजी नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे कॉमनवेल्थ लीगल एज्युकेशन कॉमनवेल्थ टर्नी आणि सॉलिसिटर जनरल कॉन्फरन्स २०२४चे उद्घाटन केले, त्यावेळी त्यांनी उपस्थितांना संबोधित केले.

'न्याय वितरणातील सीमापार आव्हाने' या विषयावर ही परिषद होत असून न्यायिक बदल आणि वकिलीचे नैतिक परिमाण, कार्यकारी उत्तरदायित्व यांसारख्या कायदा आणि न्यायाशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार आहे.

या परिषदेत भारतीय परंपरेतील न्यायाचे महत्त्व सांगताना पंतप्रधानांनी 'न्यायमूलम स्वराज्यं स्यात' या प्राचीन भारतीय म्हणीचा संदर्भ दिला. ज्याचा अर्थ न्याय हे स्वतंत्र स्वराज्याचे मूळ आहे आणि न्यायाशिवाय कोणत्याही राष्ट्राचे अस्तित्व शक्य नाही. आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात न्याय सुनिश्चित करण्यासाठी, अनेक देशांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे नमूद केले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, ''जेव्हा आपण सहकार्य करतो, तेव्हा आपण एकमेकांची व्यवस्था अधिक चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतो. अधिक समजूतदारपणामुळे चांगला समन्वय निर्माण होतो. चांगल्या समन्वयामुळे चांगला आणि जलद न्याय मिळतो. त्यामुळे असे मंच आणि परिषदा महत्त्वाच्या आहेत,'' असे ते म्हणाले.

तपास आणि न्यायामध्ये सहकार्य वाढवण्याची गरज

हवाई आणि सागरी वाहतूक नियंत्रण यांसारख्या यंत्रणांच्या सहकार्याचा आणि परस्परावलंबनाचा संदर्भ देत पंतप्रधान मोदी म्हणाले की, ''आपल्याला तपास आणि न्यायामध्ये सहकार्य वाढवण्याची गरज आहे. एकमेकांच्या अधिकारक्षेत्राचा आदर करून सहकार्य करता येते. जेव्हा आपण एकत्र काम करतो, तेव्हा अधिकार क्षेत्र हे विनाविलंब न्याय देण्याचे साधन बनते,'' असेही पंतप्रधानांनी नमूद केले.

पुणे विद्यापीठात रामलीलेवरील नाटकात आक्षेपार्ह भाषेचा आरोप

'अभाविप'ची आक्रमक भूमिका; विद्यापीठाकडे कारवाईची मागणी

पुणे दि.३ : प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्राद्वारे सादर झालेल्या प्रभू रामचंद्र आणि सीतामाता यांच्यावरील रामलीलाशी संबंधित नाटकात शिव्या आणि आक्षेपार्ह संवादाच्या मुद्द्यावरून पुण्यात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने आक्रमक भूमिका घेत शनिवार, दि. ३ फेब्रुवारी रोजी कुलगुरूंना भेटून, दोषींवर तातडीने कारवाईची मागणी केली. दरम्यान, या प्रकरणी चतु:श्रृंगी पोलिसांनी ६ जणांना ताब्यात घेतले. या कारवाईची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

शुक्रवारी रात्री हे नाटक बंद पाडण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांना मारहाणीचा प्रकारही घडला होता. याबाबत तशी पोलिसांत तक्रार करण्यात आल्याची माहिती अभाविपने दिली आहे.

शनिवारी विद्यापीठात अभाविप कार्यकर्त्यांनी कुलगुरूंची भेट घेत निवेदन दिले. या प्रकरणी दोषींवर विद्यापीठाने कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. यात अभाविपचे पुणे महानगर मंत्री हर्षवर्धन हरपुडे आणि इतरांचा समावेश होता.

अभाविपच्यावतीने दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, दि. २ फेब्रुवारीला विद्यापीठातील ललित कला केंद्राच्यावतीने नाटकांचे आयोजन करण्यात आले होते. त्यातील एक नाटक हे हिंदूंचे आदर्श प्रभू रामचंद्र आणि सीतामाता यांच्यावरील रामलीला विषयावर होते. मात्र, या नाटकात शिव्या, आक्षेपार्ह संवाद असल्याचे नमूद करीत, एकंदरच शिष्टाचार व सभ्य आचरण पायदळी तुडवत प्रभू रामचंद्र व इतर देवतांचा उपमर्द केल्याचे अभाविपने म्हटले आहे. प्रभू रामचंद्र व सीतामाता यांची प्रतिमा मलीन करून, समाजामध्ये तेढ निर्माण करून, सामाजिक शांततेचा भंग करण्याचे उद्दिष्ट ठेवून, हे सर्व जाणीवपूर्वक करण्यात आले. सांस्कृतिक डाव्या पिलावळीद्वारे देशविघातक आणि हिंदूविरोधी कृत्य केल्याचा आरोप अभाविपने केला आहे. दरम्यान, विश्व हिंदू परिषदेचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत प्रचार-प्रसार प्रमुख तुषार कुलकर्णी यांनी या घटनेचा निषेध केला. तसेच प्रा. प्रवीण भोळे यांना निलंबित करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

> ललित कला केंद्रात घडलेला रामलीलेवरील नाटकाचा प्रकार जाणीवपूर्वक केलेला खोडसाळपणा आहे. याचा तीव्र निषेध करतो.
>
> **– सुनील देवधर,** भाजप नेते

सत्यशोधन समिती गठीत

ललित कला केंद्रामध्ये नाटकाच्या सादरीकरणातील आक्षेपार्ह प्रकरणी विद्यापीठाने सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली सत्यशोधन समिती गठित केल्याची माहिती विद्यापीठाने दिली आहे. या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर, या संदर्भात विहित नियमानुसार आवश्यक ती प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असे कळविले. या प्रकरणी कुणाच्या भावना दुखावल्या गेल्या असतील, तर विद्यापीठ दिलगिरी व्यक्त करीत आहे, असे कळविण्यात आले आहे.

पारधी, मरीआई व नंदी बैल या समाजाला मूळ प्रवाहात सामावून घेण्याची गरज

पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या मुलाखतीतून उलगडले भटक्या विमुक्त समाजाचे दर्शन

सानेगुरूजी साहित्य नगरी अमळनेर, दि. ३ : विशेष प्रतिनिधी

९७व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा दुसरा दिवस (शनिवार, दि. ३ फेब्रुवारी) गाजला, तो पद्मश्री गिरीश प्रभुणे आणि चैत्राम पवार यांच्या प्रकट मुलाखतींनी! दोघांनी दुर्गम आदिवासी भागात केलेल्या कामांचे अनुभव रसिकांसमोर मांडून, एक प्रकारे ग्रामीण जीवनाचा पट उलगडला.

''मरीआई, नंदी बैल आणि पारधी समाजाला मूळ प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करत असताना, त्यास समाजानेही साथ देणे गरजचे आहे. आधुनिकतेची कास धरत चंद्रावर जात असताना, भटक्या विमुक्त समाजालाही समजून घेत, त्यांच्या प्रगतीसाठी काम करणारे साहित्य आणि युवक तयार होणे ही काळाची गरज आहे,'' असे मत पद्मश्री गिरीश प्रभुणे यांनी व्यक्त केले.

शनिवार, दि. ३ फेब्रुवारी रोजी ९७व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवसाच्या खान्देशकन्या बहिणाबाई चौधरी व्यासपीठाच्या पहिल्या सत्रात सा. 'विवेक'चे सहकार्यकारी संपादक रवींद्र गोळे (मुंबई), सारंग दर्शने (मुंबई) यांनी त्यांची मुलाखत घेतली, त्यावेळी त्यांनी हे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमेश काटे यांनी केले.

प्रभुणे यांनी आपल्या संपूर्ण आयुष्याचा पट उलगडून दाखवताना अनेक किस्से, अनुभव समस्त साहित्य रसिकांना सांगितले. आपल्या वाणीने त्यांनी या सारस्वतांना पालावरच्या जनजातींशी जोडले. प्रभुणे म्हणाले की, ''सी. एम. केतकर, माजगावकर, शरद कुलकर्णी अशा आमच्यात साहित्य परिषदेत मार्क्सवादावर खडाजंगी चर्चा होत असे. त्यावर 'माणूस' या साप्ताहिकात लेखन करत असे. मात्र, माजगावकरांनी नुसते असे लेखन करण्यापेक्षा कृती करून,

लेखन करण्याचा सल्ला दिला आणि तो तंतोतंत अमलात आणला. त्यासाठी मी काही दिवस खेडेगावात राहण्यास गेलो. रेल्वेने जाण्यासाठी स्टेशनवर आलो असता, तेथे खूप मोठी गर्दी दिसली. ३० ते ४० जण परिवारासह तेथे आले होते. त्यावेळी कोणताही कार्यक्रम, राजकीय सभा नसताना एवढी गर्दी पाहून उत्सुकता वाढली. त्यामुळे त्यांच्याशी बोलणे केले. त्यानुसार त्यांच्या गावात पाण्याची टंचाई असल्याने, शेती पिकली नाही. पिण्यास पाणी नसल्याने गाव सोडून जात असल्याचे सांगितल्याने मनात धस्स झाले.

निमगाव म्हाळगी येथे राहत असताना गावात नंदी बैलवाला, मरीआईवाले, पारधी भिक्षा मागण्यास येत. शिक्षण, संस्कार यांसारख्या विविध बाबींचा गंधही नसलेल्या, या समाजाबद्दल जवळून माहिती घेतली आणि ठरवले की, या समाजाच्या प्रगतीसाठी आपण काम करायला हवे. ही स्थिती तेव्हाची असली, तरी आजही ग्रामीण भागातील स्थिती फारशी वेगळी नाही, असे प्रभुणे यांनी या मुलाखतीत अधोरेखीत केले.

सामूहिक प्रयत्नातूनच गावाचा विकास शक्य : चैत्राम पवार

''कोणत्याही गावाचा सर्वांगीण विकास करायचा असेल, तर संपूर्ण गावाने संघटितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. सामूहिक प्रयत्नातूनच गावाचा विकास शक्य आहे,'' असे मत बारीपाडा गावाचे सुपुत्र चैत्राम पवार यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय मराठी महामंडळाचे मराठी वाङ्मय मंडळ अमळनेरद्वारे आयोजित ९७व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी 'ग्रामीण विकासाचे अर्थकारण व नियोजन' या विषयावर चैत्राम पवार यांची मुलाखत सभामंडप क्रमांक दोनमध्ये झाली. ज्येष्ठ पत्रकार शशिकांत घासकडबी यांनी ही मुलाखत घेतली.

धुळे जिल्ह्यातील बारीपाडा या ३०० घरांची वस्ती असलेल्या, गावाचा चैत्राम पवार यांनी सर्वांगीण विकास केला आहे. त्यामुळे 'आधी केले मग सांगितले' या उक्तीप्रमाणे त्यांनी केलेल्या कामांचे अनुभव मुलाखतीतून ऐकण्यासाठी सभामंडप पूर्णपणे भरलेला होता. 'ग्रामीण विकासाचे अर्थकारण व नियोजन' हा विषय साहित्याशी संबंधित नसला, तरी समाजाशी संबंधित आहे म्हणूनच घेतल्याचे मुलाखतकाराने स्पष्ट केले.

चैत्राम पवार म्हणाले की जंगल, जल, जमीन, जन व जानवर ही पंचसूत्री स्वीकारून गावाचा विकास करण्याला प्राधान्य दिले आहे. गावात आधी व्यसन तसेच वृक्षतोडीचे प्रमाण जास्त होते, ही बाब लक्षात घेऊन, गावाच्या गरजा काय आहेत, हे आधी पाहिले. नांदेडचे एक डॉक्टर बारीपाडा गावात आले आणि त्यांनी वनवासी कल्याण आश्रमाचे आरोग्य केंद्र गावात सुरू केले. एवढ्या लांबून येऊन एखादा माणूस गावाचे आरोग्य जपण्यासाठी येतो, तर मग आपण गावातच गावाचा विकास कसा करू शकत नाही, ही बाब ध्यानात घेतली. गावातील वनांचे संरक्षण करण्यासाठी आम्ही गावकऱ्यांसोबत एकत्र बसून केलेले नियम आणि प्रत्यक्ष काम याचा पट पवार यांनी उलगडला.

पान १ वरुन...

लालकृष्ण अडवाणी यांना 'भारतरत्न' जाहीर

केली. या घोषणेनंतर भाजपचे नेते, कार्यकर्ते आणि समर्थकांसह देशभरातील नागरिकांनी आनंद व्यक्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, ''लालकृष्ण अडवाणी यांना 'भारतरत्न' सन्मान प्रदान करण्यात येणार असून, ही अतिशय आनंददायी घटना आहे. लालकृष्ण अडवाणी यांच्याशी संवाद साधून, आपण त्यांचे अभिनंदन केले आहे. देशातील अतिशय ज्येष्ठ राजकारण्यांपैकी एक असलेल्या अडवाणी यांचे भारताच्या विकासामध्ये अतुलनीय योगदान आहे. तळागाळातून सामाजिक कार्यास सुरुवात करून, त्यांनी देशाचे उपपंतप्रधान म्हणून देशाची सेवा केली. त्यांनी गृहमंत्री आणि माहिती व प्रसारण मंत्री म्हणूनही काम केले आहे. त्यांची संसदीय कारकिर्द ही आमच्यासाठी अतिशय प्रेरणादायी आहे.

अडवाणी यांचे सार्वजनिक जीवन पारदर्शकता आणि सचोटीचा आदर्श असल्याचे पंतप्रधांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, ''लालकृष्ण अडवाणी यांनी राजकारणातील नैतिकतेचा अनुकरणीय असा मानक स्थापित केला आहे. राष्ट्रीय एकात्मता आणि सांस्कृतिक पुनरुत्थानासाठी त्यांनी अतुलनीय प्रयत्न केले आहेत. त्यांना 'भारतरत्न' प्रदान करणे, हा माझ्यासाठी खूप भावनिक क्षण आहे. त्यांच्याशी संवाद साधण्याच्या आणि त्यांच्याकडून शिकण्याच्या अगणित संधी मला मिळाल्या, हा मी नेहमीच माझा बहुमान मानतो,'' असेही पंतप्रधानांनी म्हटले आहे.

माझे आदर्श आणि तत्त्वांचा हा सन्मान : लालकृष्ण अडवाणी

मला प्रदान करण्यात येणारा 'भारतरत्न' हा माझे आदर्श आणि तत्त्वांचा सन्मान आहे, अशी भावनिक प्रतिक्रिया माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी यांनी व्यक्त केली. हा सन्मान दिल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेही त्यांनी आभार मानले आहेत.

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी उपपंप्रधान लालकृष्ण अडवाणी यांनी त्यांना जाहीर झालेल्या 'भारतरत्न' या सर्वोच्च नागरी सन्मानाविषयी कृतज्ञता व्यक्त केली. ते म्हणाले की, अत्यंत नम्रतेने आणि कृतज्ञतेने मी आज मला जाहीर केलेला 'भारतरत्न' स्वीकारतो. एक व्यक्ती म्हणून माझ्यासाठी हा केवळ सन्मानच नाही, तर मी माझ्या क्षमतेनुसार आयुष्यभर ज्या आदर्शांची आणि तत्त्वांची सेवा करण्याचा प्रयत्न केला आहे, त्यांचाही सन्मान आहे. वयाच्या १४व्या वर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्वयंसेवक म्हणून मी सामील झालो. तेव्हापासून मी फक्त एका गोष्टीत बक्षीस मागितले आहे. माझ्या प्रिय देशाची समर्पित आणि निःस्वार्थ सेवा माझ्यावर सोपवलेले कोणतेही कार्य 'इदं न मम' हे जीवन माझे नाही. माझे जीवन माझ्या राष्ट्रासाठी आहे, याच भावनेने आपण कार्यरत असल्याचे ते म्हणाले.

लालकृष्ण अडवाणी यांची कारकिर्द

अडवाणी यांनी २००२ ते २००४ दरम्यान अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारमध्ये भारताचे सातवे उपपंतप्रधानपद भूषवले होते. तसेच १९९८ ते २००४ दरम्यान भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीत (एनडीए) गृहमंत्री होते. भारतीय जनता पक्षाची पायाभरणी करणाऱ्यांमध्ये त्यांचा समावेश होतो. दहाव्या आणि १४व्या लोकसभेच्या काळात त्यांनी विरोधी पक्षनेतेपदाची भूमिका चोख बजावली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. २०१५ मध्ये त्यांना 'पद्मविभूषण' भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान देण्यात आला होता.

१९५१ साली डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांनी जनसंघाची स्थापना केली. तेव्हापासून १९५७ पर्यंत अडवाणी पक्षाचे सचिव राहिले. १९७३ ते १९७७ पर्यंत त्यांनी भारतीय जनसंघाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली. १९८० मध्ये भारतीय जनता पक्षाची स्थापना झाल्यानंतर लालकृष्ण अडवाणी १९८६ पर्यंत पक्षाचे सरचिटणीस होते. यानंतर त्यांनी १९८६ ते १९९१ या काळात पक्षाच्या अध्यक्षपदाची जबाबदारीही त्यांनी सांभाळली.

श्रीराम जन्मभूमी आंदोलन १९९० मध्ये सुरू झाले. या आंदोलनादरम्यान अडवाणींनी सोमनाथ ते अयोध्या अशी राम रथयात्रा काढली. १९९०च्या रथयात्रेने लालकृष्ण अडवाणी यांची लोकप्रियता शिगेला पोहोचली, त्यानंतर अखेर हिंदूंनी १९९२ साली वादग्रस्त बाबरी ढाँचा उद्ध्वस्त केला होता. त्यानंतर हिंदुत्वाचे राजकारण देशात केंद्रस्थानी आणण्यात अडवाणी यांची भूमिका अनन्यसाधारण होती.

अडवाणीजींचे अभिनंदन

> *भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांना मभारतरत्नफ देऊन सन्मानित करण्याचा निर्णय अत्यंत आनंददायी आहे. भाजपच्या सर्व कार्यकर्त्यांच्या वतीने या निर्णयाबद्दल मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानतो आणि अडवाणीजींचे अभिनंदन करतो.*
>
> *– **जगतप्रकाश नड्डा,** राष्ट्रीय अध्यक्ष, भाजप*

'संस्कार भारती'तर्फे 'स्व' जपणाऱ्या कलाकारांचा गौरव : डॉ. मोहनजी भागवत

(दृश्यकला) यांना सरसंघचालकांच्या हस्ते 'संस्कार भारती-२०२३'चा 'भरतमुनि सन्मान' प्रदान करण्यात आला. कला अभ्यास व कार्यक्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल 'संस्कार भारती'तर्फे या कलाकारांना गौरविण्यात आले.

'संस्कार भारती'च्या कलासाधक संगम कार्यक्रमाचे कौतुक करत सरसंघचालक म्हणाले की, ''आपल्या देशात स्वतंत्रतेचा 'स्व' आणि भारताचे भारतीयत्व यांचा गौरव जनमानसात जागृत होण्यामध्ये बराच काळ गेला असला, तरी आता तो सुरळीतपणे होऊ लागला आहे. भारतीयत्वाच्या कोणत्याही पैलूत साधना करून, त्याचे संवर्धन करणारे तपस्वी यापूर्वी समाजिकदृष्ट्या उपेक्षित होते. ती उपेक्षा आता संपली असून, कलासाधक संगमच्या माध्यमातून ते दिसून आले आहे.''

'संस्कार भारती' हे नाव का, हे सांगताना सरसंघचालक यावेळी म्हणाले की, ''सध्या विविध क्षेत्रांमध्ये निरनिराळ्या संघटना कार्यरत आहेत. मजुरांसाठी कामगार (मजदूर) संघटना आहे, विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी परिषद आहे, खेळाच्या क्षेत्रासाठी क्रीडा भारती आहे. मात्र, कला क्षेत्रासाठी कला भारती नसून 'संस्कार भारती' आहे. कारण, कलेचा संबंध मनोरंजनाशी कमी तर माणसातल्या प्रगतिशील स्वभावाशी जास्त असतो.

अयोध्येत दि. २२ जानेवारी रोजी श्रीरामलला मंदिरात विराजमान झाले, त्यादिवशी भारताचा 'स्व' परत आला व त्यानंतर प्रत्येक क्षेत्रात 'स्व'च्या प्रकटीकरणाचे प्रसंग दिसू लागतील,'' असे सरसंघचालक प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या भाषणात म्हणाले होते. त्यापैकी पहिला प्रसंग आज 'संस्कार भारती'मुळे देशात प्राप्त झाला, असे सरसंघचालक म्हणाले.

पूज्य व्यक्तिमत्त्वाकडून पुरस्कार मिळणे हे भाग्यच!

> *ज्या कलेची इतकी वर्षे साधना केली, त्या कलेसाठी आज हा पुरस्कार मला मिळाला, ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट आहे. विषेशतः देशातील एक पूज्य व्यक्तिमत्त्व म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते, त्या डॉ. मोहनजी भागवत यांच्या हस्ते हा पुरस्कार मिळणे, हे माझे भाग्यच. वनवासी बांधव आज ११ कला जोपासण्यात पारंगत आहेत. मीदेखील त्यांच्यापैकीच एक आहे. 'संस्कार भारती'ने या पुरस्कारासाठी माझी निवड केल्याबद्दल त्यांचे आभार.*
>
> *– **गणपत सखाराम मसगे,** पुरस्कार्थी*

आई-वडिलांचे आशीर्वाद आणि परमेश्वाराची कृपा



> *मी आज या पुरस्कारासाठी पात्र ठरलो, ते आई-वडिलांचे आशीर्वाद आणि परमेश्वराच्या कृपेमुळे. कलेची साधना पूर्वीपासूनच करण्याची आवड. त्यामुळे या कलेचे आजवर एखाद्या वृक्षाप्रमाणेच संगोपन करत आलो आहे. आज तेच वृक्ष चांगल्या तऱ्हेने बहरल्याचे दिसत आहे. 'संस्कार भारती'ने दिलेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे मनोभावे आभार.*
>
> *– **विजय दशरथ आचरेकर,** पुरस्कार्थी*

'कला केवळ मनोरंजनाचे साधन'

कला ही केवळ लोकांचे मनोरंजन करण्याचे साधन नाही. त्या कलेत विचार आणि संस्कृती यांची सांगड घातली, तर त्याचा संदेश प्रभावी ठरतो. त्याने आपले ध्येय यशस्वी होऊ शकते, असे प्रतिपादन संस्कार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष वासुदेव कामत यांनी केले. संस्कार भारतीतर्फे आयोजित मअखिल भारतीय कलासाधक संगमम या चार दिवसीय कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा गुरुवारी बंगळूरच्या श्री श्री रविशंकर इंटरनॅशनल सेंटर येथे संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते. कामत यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात कलेविषयक मोलाची मते मांडली.

विक्री सूचना

श्री राधे मेटलिक्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)

परिसमापकः प्रभाकर कुमार
नोंदणीकृत कार्यालयः ५१२, आशीर्वाद इमारत, ६४/ई, अहमदाबाद स्ट्रीट, कर्नाक बंदर, मस्जिद बंदर मुंबई शहर महाराष्ट्र - ४००००९ भारत
ईमेल आयडीः cirp.srmpl@gmail.com, prabhakar_acs@rediffmail.com
संपर्क क्र.: +९१ ९८७००११५३२

ई-लिलाव

नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अन्वये मालमत्तेची विक्री
ई-लिलावाचा दिनांक आणि वेळः दि. ०७ मार्च, २०२४ रोजी दु. ३.०० भाप्रवे ते सायं. ५.०० भाप्रवे
ईएमडी सादरीकरणाचा दिनांकः दि. ०५ मार्च, २०२४
कागदपत्रे सादरीकरणाचा दिनांकः २२ फेब्रुवारी, २०२४
पाहणीचा किंवा योग्य चौकशीचा दिनांकः दि. ०२ मार्च, २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी
(प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)

माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ IV यांच्याद्वारे दिनांक २४ मार्च, २०२३ रोजीच्या आदेशानुसार नियुक्त परिसमापकाद्वारे बनविण्यात आलेल्या परिसमापन मालमत्तेचा भाग असणाऱ्या श्री राधे मेटलिक्स प्रायव्हेट लिमिटेडच्या मालकीच्या संपत्ती आणि मालमत्तांची विक्री. विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारे ई-लिलाव प्लॅटफॉर्म https://ncltauction.auctiontiger.net मार्फत करण्यात येईल.

ब्लॉक	मालमत्ता	राखीव किंमत (₹ मध्ये)	ईएमडी रक्कम (₹ मध्ये)	विस्तारयोग्य मूल्य (₹ मध्ये)
ए	**स्वतंत्र तत्त्वावर जमीन आणि इमारतीची विक्री:** स्वतंत्र तत्त्वावर प्लॉट क्र. ६४१ई, प्रिन्सेस डॉक विभाग, अहमदाबाद स्ट्रीट, कर्नाक बंदर, मुंबई ४००००९ येथे आशीर्वाद प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि.द्वारे विकसित केलेल्या "आशीर्वाद इमारती"च्या ५ व्या मजल्यावर स्थित कार्यालय क्र. ५१२	११,४२,९१०	१,१४,२९१	-
बी	**स्वतंत्र तत्त्वावर प्रतिभूती किंवा वित्तीय संपत्तीची विक्री:** यामध्ये चालू नसलेली गुंतवणूक, ट्रेड रिसिव्हेबल्स समाविष्ट स्वतंत्र तत्त्वावर	११,३६,३७८	१,१३,६३७	-
सी	**भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३७ए अन्वये सहज सोडविता न येणाऱ्या संपत्तीची नियुक्ती** निर्णय घेणारे अधिकारी यांच्या समक्ष दाखल प्राधान्य आणि अवमूल्यन केलेले व्यवहार टाळण्याकरिता केलेल्या अर्जाकरिता, खटल्याचे अधिकार आणि निकालातील परिणामी अधिकार याच्या नियुक्तीसह प्राप्य व्यापार आणि अग्रीमच्या श्रेणीची नियुक्ती	-	२५,०००	-

ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे

१. ई-लिलाव मान्यताप्राप्त सेवा प्रदाता मे. ई-प्रोक्युअरमेन्ट टेक्नोलॉजिस लिमिटेड (ऑक्शन टायगर) मार्फत "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे" आणि "तेथे जे आहे तत्त्वावर" आयोजित करण्यात येईल.

२. **कंपनीच्या संपत्ती संदर्भात संपूर्ण आणि तपशीलवार माहिती वेबसाईट्स म्हणजेच https://ncltauction.auctiontiger.net वर उपलब्ध असलेल्या "ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवज"मध्ये उपलब्ध आहे. संपूर्ण माहिती प्राप्त करण्याकरिता "ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवजा"सोबत विक्री सूचना देखील वाचावी लागेल.**

३. मालमत्तांचे तपशील, ऑनलाईन ई-लिलाव बोली अर्ज, उद्घोषणा आणि हमी अर्ज, ऑनलाईन लिलाव विक्रीच्या सर्वसाधारण अटी आणि शर्ती समाविष्ट असलेले संपूर्ण ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवज वेबसाईट https://ncltauction.auctiontiger.net वर उपलब्ध आहेत. संपर्कः श्री. रामप्रसाद यांना +९१-६३५१८९६८३४/ ०७९-६१२००५८६ आणि ६३५१८९६८३४ ramprasad@auctiontiger.net/ neha.gyani@auctiontiger.net/ support@auctiontiger.net (https://ncltauction.auctiontiger.net या लिंकवर गेल्यावर) इच्छुक बोलीदारांना खालील दोन पैकी एका पर्यायाचा वापर करून उल्लेखित कंपनीचा शोध घ्यावा लागेल, (I) कंपनीचे नाव (श्री राधे मेटलिक्स प्रायव्हेट लिमिटेड), किंवा (II) राज्य आणि मालमत्तेचा प्रकार.

४. इच्छुक बोलीदारांनी, त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी, मालमत्तेचे शीर्षक, स्थानिक कर, वीज आणि पाणी शुल्क, देखभाल प्रभाराची थकबाकी, जर असल्यास, यासंबंधी त्यांची स्वतंत्र चौकशी करावी आणि त्यांच्या स्वतःच्या खर्चाने मालमत्तेची पाहणी करावी आणि त्यांचे स्वतःचे समाधान करून घ्यावे. वर उल्लेखिलेल्या मालमत्तांची संभाव्य बोलीदार श्री. प्रभाकर कुमार यांना संपर्क करून पूर्व परवानगीने साईटवर पाहणी करू शकतात.

५. ई-लिलावामध्ये सहभागी होण्याकरिता पात्र बोलीदारांची नावे परिसमापकाद्वारे पोर्टल (https://ncltauction.auctiontiger.net) वर निश्चित करण्यात येतील. ई-लिलाव सेवा प्रदाता (ऑक्शन टायगर) पात्र बोलीदारांना ईमेलद्वारे यूजर आयडी आणि पासवर्ड प्रदान करतील.

६. जर, ई-लिलाव बंद होण्याच्या वेळी शेवटच्या ५ मिनिटांमध्ये बोली सादर झाल्यास, बंद होण्याची वेळ आपोआपच ५ मिनिटांकरिता अमर्यादित विस्तारासह वाढविण्यात येईल. जो बोलीदार ई-लिलाव प्रक्रिया बंद होताना उच्चतम बोली रक्कम सादर करेल (राखीव किंमतीपेक्षा कमी नाही) त्याला यशस्वी बोलीदार म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्याबाबतची माहिती ईलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे पारित करण्यात येईल जी परिसमापकाच्या मंजुरीच्या अधीन असेल.

७. श्री राधे मेटलिक्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)च्या सहज सोडविता न येणाऱ्या संपत्तीकरिता ("एनआरआरए"), भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ अंतर्गत "जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे, तेथे जे आहे आणि कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर" नियुक्तीकरिता देखील गुंतवणुकदारांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

सही/-
प्रभाकर कुमार
परिसमापक, श्री राधे मेटलिक्स प्रायव्हेट लिमिटेड - परिसमापनामध्ये
आयबीबीआय नोंद. क्र.: IBBI/IPA-002/IP-N00774/2018-2019/12373
पत्रव्यवहाराचा पत्ताः बी-५/४१, तळमजला, विवेकानंद अपार्टमेंट, सेक्टर ८, रोहिणी, दिल्ली - ११००८५ | **संपर्क क्र.:** +९१ ९८७००११५३२
ईमेल आयडीः prabhakar_acs@rediffmail.com

दिनांकः ०४.०२.२०२४
ठिकाणः मुंबई